Vol. 7, Issue 4, January 2018 ISSN 2249-894X

# REVIEW OF RESEARCH

*An International Multidisciplinary Peer Reviewed & Refereed Journal*

**Impact Factor: 5.2331**

**UGC Approved Journal No. 48514**

**Chief Editors**
Dr. Ashok Yakkaldevi
Ecaterina Patrascu
Kamani Perera

**Associate Editors**
Dr. T. Manichander
Sanjeev Kumar Mishra

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 4 | JANUARY - 2018

# 'वाडा' आंध जमातीच्या जीवनसंघर्षाची कादंबरी : एक चिंतन

श्री. एस. पी. खुपसे
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग , तोश्णीवाल कला, वाणिज्य व विज्ञान,
महाविद्यालय सेनगांव जि. हिंगोली.

## प्रस्तावना–



आदिवासी साहित्य हे रानावनातील वंचिताचे साहित्य होय. ज्यांच्या प्रश्नांना भूतकाळाने कधी उत्तरेच दिली नाहीत, अशा दुर्लक्षितांचे हे साहित्य आहे. ज्यांच्या आक्रोशाला इथल्या सावत्र समाजव्यवस्थेने कधी न्यायच दिला नाही., अशा गिरीकुहरातील अन्यायग्रस्तांचे ते क्रांतीसाहित्य होय. इथल्या क्रूर कठोर न्यायव्यवस्थेने ज्यांच्या शेकडो पिढयांना आजीवन वनवास ठोठावला त्या आदिवासी समूहांचे ते मुक्तिसाहित्य होय. "आदिवासींचे घायाळ आयुष्य ज्या संस्कृतीच्या कुसाआड राहिले, त्या संस्कृतीच्या प्राचीन इतिहासाला कुळारंभ देणारे हे साहित्य आहे. आदिवासी साहित्य हे या भूमीने प्रसविलेल्या आदिम वेदनेचे, जाणिवेचे शब्दरुप होय"

1950 ते 2000 या कालखंडात कादंबरी वाङमय प्रकाराशी आदिवासींनी फारकत घेतली की काय, असे वाटायला लागते. तरीही वाळवंटात हिरवळ तसे काहीसे चित्र पहावयास मिळते. काही जिद्दी, घडपडया सेवावृती आदिवासींनी कादंबरीलेखन करुन कादंबरीच्या अफाट विश्वात आपल्या अस्तित्वाचे संकेत दिले आहेत. त्यात नजूबाई गावीत, धुळे, प्रा. माधव सरकुंडे, बाबाराव मडावी, यांचा गौरवपूर्ण उल्लेख करावा लागतो. रानातले बंदिस्त स्तर, त्यांच्या वाटयाला आलेले अवहेलनेचे, कुचाळकीचे जिणे, त्यांनी अनुभवलेली शोषणाची–अपमानाची घग, कासावीस होईपर्यंत त्यांच्या अस्मितेला ठोकरणाऱ्या सावकारीची, पाटीलकीची निर्लज घमेंड, अंध्दश्रध्दांच्या आचेने किडलेली त्यांची मानसिकता, आंदोलनाच्या रेटयामुळे हांतर्बाह्य ढवळून निघालेल्या त्यांच्या जीवनातील नवी गुंतागुंत व आव्हाने आणि त्यातून वेगाने उसळलेल्या मुक्तीगर्जना व परिवर्तनाच्या दृढ आनाभाका हे सर्व या लेखकांनी आपल्या कादंबऱ्या मधून तागदीने पुढे आणले आहे.

आदिवासी कवी, कार्येकर्ते, व विचारवंत प्रा. माधव सरकुंडे यांची ष्वाडाष ही पहिलीच पण तितकीच वाचनीय कादंबरी. देवयानी प्रकाशन, यवतमाळ व्दारा 1996 साली ती प्रसिध्द झाली. आदिवासींमधील 'आंध' जमातीवरील त्यांच्याच व्यवहारी बोलीतील ही कादंबरी आहे. प्रा. सरकुंडे हे स्वतः त्याच आंध जमातीचे असल्यामुळे त्यांनी समाजाच्या वाटयाला आलेले जिणे स्वतः जगले व भोगले आहे. त्यामुळे त्यांच्या अनुभवांचा अस्सलपणा कादंबरीत आला आहे. सामाजिक व्याधींनी, जातीय दंशाने आंधाना कसे घायाळ करुन सोडले आणि गावाच्या पाटीलकीने त्यांचे कसे सर्वांगीण शोषन केले, यांचे वास्तव चित्रण या कादंबरीत आले आहे. हे चित्रण काल्पनिक नाही. आंधांच्या जीवनाचा तळ घुसळून त्यातील दुःख दैन्याची व वेदनांची कारणमीमांसाच प्रा. सरकुंडे यांनी या कादंबरीत केली आहे. "आपले नशीबच असे" असा आंधळा सूर आळवित बसलेल्या आंधांना वठणीवर आणणारा जबर धक्का या कादंबरीने वैचारिकतेने दिला आहे.

'वाडा' या कादंबरीची कहाणी इतर कथांसारखी काल्पनीक नाही. ती जीवंत माणसांची कहाणी आहे. आज जरी ही माणसं जीवंत नाहीत, तरी ही माणसं सुमारे दिडशे वर्षापूर्वी जंगली विभागातील वाडयांमध्ये जीवन जगत होते. वाटयाला आलेले भोग भोगत होते. हवेल्यात राहणारा जमीनदार वर्ग या माणसांचे शोषन कसा करत होता, हे पुन्हा सांगणार नाही. ते तुम्हास पुस्तकात दिसेलच असे जेव्हा प्रा. माधव सरकुंडे लिहितात, तेंव्हा या कादंबरीतील पात्रांचे जगणे व्यवस्थेच्या इशाऱ्यावर कसे गरगरते हे ध्यानात येईल.

सुप्रसिध्द समीक्षक, विचारवंत डॉ. श्रीपाल सबनीस यांनी 'वाडा' या कादंबरी विषयी आपला अभिप्राय असा नोंदविला आहे. बाज्याने ठरविल्या नुसार तो पाटलाचा मुडदा पाडतोच ! जमीनदार आणि आदिवासी यांच्यातील भीषण संबंधातून आकारास आलेल्या जीवनसंघर्षाची कथा या कादंबरीत आल्याने या कादंबरीचे अनुभूतीविश्व समाजजीवनाच्या जीवंत वास्तवाशी सत्याच्या अटीत संवाद साधते. म्हणूनच आदिवासींच्या संघर्षमय समूहजीवनाची यशस्वी कलाकृती म्हणून 'वाडा' या कादंबरीची नोंद अटळ आहे.

स्वतः लेखक आंध जमातीच्या नाळेशी जन्मसंदर्भ जोडून असल्याने बोलीभाषा, व्यक्तिनमुने, संवाद, घटना–तपशील, पर्यावरण इत्यादी सर्व तपशील जीवंत होऊन कादंबरीत अवतरतो. आंध जमातीच्या यातनांचा इतिहास 'वाडा' च्या निमित्ताने समस्त मराठी वाचकांपर्यंत पोचविण्यात प्रा. माधव सरकुंडे निश्चितच यशस्वी झालेत. या कादंबरीत कृत्रिम संरचनेचे प्रयत्न राहीत. अलंकारीक भाषा नाही. कारागिरीचा हेतू व स्वरुपही नाही. ज्यामुळे खोटे रंग आणि युक्त्यांचा आढळ या कलाकृतीत दिसत नाही. अतिसामान्य पातळीवर जीवन जगणाऱ्या, अन्यायाने पिचणाऱ्या, उध्वस्त होणाऱ्या, मरणाऱ्या व सूडाने बदला घेणाऱ्या या व्यक्तिरेखांच्या एकत्र बांधणीतून ही कादंबरी आकार घेते. अर्थातच ही रंजनवादी कादंबरी नाहीच ! तिचे कलात्मक यश तिच्या वास्तवतेच्या दर्शनात आहे.

आंधवाडयापासून कादंबरीला सुरुवात होते. "बरी आंधाडे हो ! कर्ज नेतांनी लाज वाटत नाही, अन् देतांनी चावळया बावळया करता. तुमच्या गांडीचे बेतानं कातडे काढायला फायजे. सांग मादरचोदा कव्हा वापस करतू मव्हं कर्ज ? " अशा शिवराळ भाषेत राघोबा आंधावर ग्यानबा पाटील गुर्रावतो. त्याच्या राधी नावाच्या बायकोला तो वाडयावर बोलावून राघोबाच्या उपस्थितीत तिला लुटतो. पण राघोबा काहीच करु शकत नाही. किती असह्य व लाचार होते आंध ! पण कादंबरीतील 'बाज्या' मात्र एक जागरुक व क्रांतीकारी विचाराचा प्रतिनिधी आहे. आंधांवरील पाटलाची भक्कम आसूनी पकड कायमची संपुष्टात यावी या नेक इराद्याने तो जगत असतो. "आबा वाघामायीची शपत् ! पाटलाचा खटारा पाडीन, तरच नावाचा बाज्या व्हइन," अशा सूडभावनेने तो पेटत असतो. पदरी बांधून ठेवलेली ही आन त्याला स्वस्थ बसू देत नाही. शेवटी तो पाटलाचा मुडदा पाडून सजाही भोगतो. "हो आबा आपुन गरीब हावं, हे मान्य हाय, पण गरीबावं कायीबी आन्याव करावं हे कोण्या देवानं ग्यान दिलं" , हा बाजाचा आतला आवाज स्नेहसमत्वभावाचा उद्घोष आहे. आंधांमधील पोटभेदावर बाज्या धिटाईने आसूड ओढतो. आंधांमधील 'वरपायले' व 'खालपायले' असे पोटभेद पाहून तो दुःखी होतो. "आगुरदतं वाणी, बामनं, पाटलं आपल्या समाजाला हालका समाज म्हणून छेळतेत. आन् आपुन आपल्यात आसा भेदभाव केला तं आपला समाज कधीच सुदरणार नायी, " अशा शब्दात तो एका लग्नप्रसंगी 'डुकऱ्यामामा' ला फटकारतो. यावरुन बाजाची समतादृष्टी ध्यानात येते. परिवर्तनाचे त्यांनी पाहिलेले स्वप्न कळू लागते.

साखऱ्या हा म्हणायला आंधांचा म्होरक्या, पण गावाच्या पाटलाचा बांधील व पलटू, जुन्या वळणाचा परंपराचा पूजक. बाज्या बद्ल सतत दुष्टावा ठेवणारा व पाटलाचे कान भरणारा म्होरक्या ! या सर्व प्रवृत्ती आंधांमध्ये पूर्वी नांदत होत्या. अनेक अंधश्रध्दांनीही आंधांना घेरुन ठेवले होते. करणी करणे, भानामतीचे प्रयोग करणे, मूठ चालवणे, मरीमायची शांती करणे, तिच्यापुढे बोकड कापणे, त्याच्या गरम रक्तात ज्वारीच्या कण्या भिजवून मरीमायला नैवैद्य वाहणे, वाळीत टाकणे, पोटभोद मानणे या आंधांमधील प्रचलित कुप्रथांचे दर्शनही प्रा. माधाव सरकुंडे यांनी घडविले आहे. "मला एकच गोष्ट समजते की, पाटील तुमच्यावं, तुमच्या पोरीबाळीवं अन्यावं करते. तुम्ही भितऱ्या फोद्याचे दातखिळया बसल्यावाणी मुके राहता." किंवा "पण आबा मला समजत नाय, आपुन आंध हावोतं काय झालं, आंधत् मानसच हायत नं ? "

किंवा "काय पण–पण करत् आबा. मला ठाऊक हाय. तुम्ही सर्वे आंध भित्र्या गांडीचे हां." असे विद्रोही संवाद बाज्याच्या तोंडी घालून प्रा. माधव सरकुंडे यांनी आंधारलेल्या आंधवाडीला भावनेच्या कोलीताने चेतविले आहे. आंधांना चेव आणणारा कादंबरीचा हा प्रारंभ आशादायक व रचनात्मक आहे. सामाजिक उठावाचे बळ देत आणि केवळ आंधांनाच नव्हे तर समग्र आदिवासींना हाकारत निघालेल्या प्रा. माधव सरकुंडे यांचा सूर सर्वांना प्रेरक व हितकारक वाटावा असाच आहे. आंधांच्या बोलीभाषेत ही कादंबरी असल्यामुळे एका भाषिक वेगळेपणासकट आंधांच्या आंतरिक उर्मीची पारदर्शकताही त्यातून जाणवते. आंधाना न्याय देणारी, त्यांना संघर्षास सिध्द करणारी आणि त्यांचे मुकेपण घालवून बोलते करण्याची किमया करणारी कादंबरी लिहून एका नव्या परिवर्तनाचा शुभारंभ प्रा. माधव सरकुंडे यांनी केला आहे.

## निष्कर्ष :

1. 'वाडा' ही आंध जमातीचे वास्तव चित्रण करणारी आदिवासी कादंबरी आहे.

2. आदिवासी समाजातील दुःख, दैन्यांची व वेदनांची कारणमीमांसा या कादंबरीत आहे.
3. या कादंबरीतील पात्रे व्यवस्थेच्या इशाऱ्यावर कसे गरगरते हे लक्षात येते.
4. जमीनदार आणि आदिवासी यांच्यातील जीवनसंघर्षाची कथा या कादंबरीत आली आहे.
5. 'आंध' जमातीची बोली, व्यक्तीनमुने, संवाद, घटना–तपशील, पर्यावरण इत्यादी तपशील कदंबरीत अवतरतात.
6. 'आंध' जमातीमधील कुप्रथांचे दर्शनही या कादंबरीतून घडते.

### संदर्भः


1. 'वाडा' – प्रा. माधव सरकुंडे
2. आदिवासी साहित्य दिशा आणि दर्शन– प्रा. डॉ. विनायक तुमराम
3. आदिवासी साहित्य स्वरुप आणि समीक्षा– प्रा. डॉ. विनायक तुमराम
4. परिवर्तनाची संकल्पना आणि आदिवासी साहित्य– भुजंग मेश्राम
5. आदिवासी, मुस्लिम, ख्रिश्चन साहित्य मीमांसा– डॉ. श्रीपाद सबनीस